सकाळ@90
साक्षीदार ९ दशकांचा, साथीदार भविष्याचा!

पुणे, शनिवार,
१ ऑक्टोबर २०२२

# आज पुण्यात

## सकाळी

- **शिष्यवृत्तीवाटप** : आयोजक - श्री शिवाजी मराठा सोसायटी : प्रमुख उपस्थिती - डॉ. राम ताकवले, बाबा आढाव : स्थळ - श्री शिवाजी मराठा सोसायटीचे जिजामाता सभागृह, शुक्रवार पेठ : १०.००
- **गौरव समारंभ** : अग्निशमन दल अधिकारी व जीवरक्षकांचा कृतज्ञता गौरव : हस्ते - चंद्रकांत पाटील : प्रमुख उपस्थिती - माणिक चव्हाण, संदीप कर्णिक : आयोजक - तुळशीबाग गणपती सार्वजनिक मंडळ : स्थळ - नूमवि प्रशाला, बाजीराव रस्ता : ११.३०

## दुपारी

- **पुणे नवरात्र महोत्सव** : लावणी महोत्सव : सहभाग - वर्षा पवार, सोनाली जळगावकर, शिवानी कोरे, पूनम कापसे, सुप्रिया जावळे, कावेरी घंगाळे, चतुर्थी पुणेकर, पतंजली पाटील, वैजयंती पाष्टे, वासंती पुणेकर, माया खुटेगावकर, प्रिया मुंबईकर, अर्चना जावळेकर, नमिता पाटील : स्थळ - श्री गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट : १२.००
- **व्याख्यान** : विषय - तंत्रज्ञानाने अध्यात्माचे मार्गदर्शन आनंददायी कसे होऊ शकते : वक्ते - डॉ. अनिल राजवंशी : स्थळ - नवलमल फिरोदिया सेमिनार हॉल, एमसीसीआयए, आयसीसी टॉवर, सेनापती बापट रस्ता : १२.००
- **नवरात्र** : विविध भजनी मंडळांचा कार्यक्रम : स्थळ - श्री भवानी देवी मंदिर, भवानी पेठ : २.३०

## सायंकाळी

- **नवरात्र** : देवदासींच्या मुलींचे कन्यापूजन : स्थळ - श्री महालक्ष्मी मंदिर, सारस बाग : ५.००
- **गौरव** : पाणी व पर्यावरण क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव : हस्ते - सीमंतिनी खोत : आयोजक - रोटरी जलसंवर्धन समिती, संस्कार भारती : स्थळ - इचलकरंजी सभागृह, कर्वे शिक्षण संस्था, कर्वेनगर : ५.००
- **प्रकाशन** : डॉ. माधुरी जोशीलिखित 'बिंदा कहे' पुस्तकाचे प्रकाशन : हस्ते - अच्युत गोडबोले : स्थळ - गणेश सभागृह, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता : ५.३०
- **पुरस्कार** : मानिनी पुरस्कार वितरण सोहळा : आयोजक - मानिनी ॲक्टिव्हिटी ग्रुप : प्रमुख उपस्थिती - डॉ. शेखर कुलकर्णी : स्थळ - सिद्धार्थ हॉल, माणिकबाग, सिंहगड रस्ता : ५.३०
- **उद्‍घाटन** : 'राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताहा'चे उद्‍घाटन : हस्ते - सुशीलकुमार शिंदे : स्थळ - महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधी भवन, कोथरूड : सायंकाळी ६.००
- **पुरस्कार** : इतिहास अभ्यासक संभाजी भोसले यांना 'स्नेहांजली पुरस्कारा'चे वितरण : हस्ते - सुरेश प्रभू : अध्यक्ष - डॉ. गो. बं. देगलूरकर : स्थळ - एस. एम. जोशी सभागृह, गांजवे चौक, सदाशिव पेठ : ६.००
- **स्लाइड शो** : विषय - 'मुंग्यांच्या जगात' : सादरकर्त्या - नूतन कर्णिक : स्थळ - अंतर्नाद योग केंद्र, करिष्मा सोसायटीजवळ, कोथरूड : ६.३०

# थोडक्यात

- **पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी** : डॉक्टर मेळावा; प्रमुख पाहुणे -नाना पटोले, डॉ. विश्वजित कदम : राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल, शिवदर्शन : सकाळी ९.
- **श्री शिवाजी मराठा सोसायटी :** गुरुवर्य बाबूराव जगताप पुण्यतिथी समारंभ-शिष्यवृत्ती प्रदान; उपस्थिती : बाबा आढाव, डॉ. राम ताकवले : श्री शिवाजी मराठा सोसायटी, शुक्रवार पेठ : सकाळी १०.
- **द पुणे फाउंटन पेन शो २०२२** : ७५ पेक्षा अधिक ब्रॅन्डच्या पेनचे प्रदर्शन : श्रुती मंगल कार्यालय, आपटे रस्ता, डेक्कन : सकाळी १०.
- **कलादालन... एक अनुभूती** : आर्ट आणि क्राफ्टचे अभिरुची प्रदर्शन : कोहिनूर मंगल कार्यालय, प्रभात रस्ता : सकाळी ११.
- **पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि शहर काँग्रेस ज्येष्ठ नागरिक संघ :** मोफत कायदेविषयक मार्गदर्शन; मार्गदर्शक : ॲड. राजेंद्र काळेबेरे, ॲड. राहुल ढाले, ॲड. विजय राऊत, ॲड. रशिदा सय्यद, ॲड. रुक्साना शेख : काँग्रेस भवन, शिवाजीनगर : सकाळी ११.
- **ड्रीम्स टु रिॲलिटी आणि विंग्ज मीडिया :** बाप्पाग्राफी छायाचित्रांचे प्रदर्शन आणि स्पर्धा : बालगंधर्व कलादालन : सकाळी ११.
- **श्री तुळशीबाग गणपती उत्सव मंडळ :** अग्निशमन दल अधिकारी व जीवनरक्षकांचा गौरव समारंभ; हस्ते : चंद्रकांत पाटील, पाहुणे : माणिक चव्हाण, संदीप कर्णिक : नूमवि प्रशाला, बाजीराव रस्ता : सकाळी ११.३०.
- **पीएमपीएमएल सेवानिवृत्त कर्मचारी संघ :** ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा : पीएमटी कामगार संघ (इंटक) ऑफिस, इन्कमटॅक्स ऑफिस, स्वारगेट : दुपारी १२.
- **पुणे इंटरनॅशनल सेंटर :** 'हाऊ टेक्नॉलॉजी गायडेड बाय स्पिरिच्युॲलिटी मे लीड टू हॅपिनेस' विषयावर व्याख्यान; वक्ते : डॉ. अनिल राजवंशी : नवलमल फिरोदिया सभागृह, एमसीसीआयए, सेनापती बापट रस्ता : दुपारी १२.

# दैनंदिनी

- **एस. एन. बी. पी. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज :** २५ तासांचा स्वरयज्ञ महोत्सव : प्रमुख उपस्थिती : पं. अजय पोहनकर, डॉ. विकास कशाळकर. **स्थळ :** एस. एन. बी. पी. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, येरवडा. **वेळ :** स. ७ ते रा. ९.
- **श्री शिवाजी मराठा सोसायटी :** गुरुवर्य बाबूराव जगताप पुण्यतिथी समारंभ : शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम : उपस्थिती : माजी कुलगुरू प्रा. डॉ. राम ताकवले, डॉ. बाबा आढाव. **स्थळ :** जिजामाता सभागृह, शुक्रवार पेठ. **वेळ :** स. १०.
- **दी पुणे फाउंटन पेन शो :** विविध शाई पेनांची असंख्य व्हरायटी असलेला पेन शो : **स्थळ :** श्रुती मंगल कार्यालय, आपटे रस्ता. **वेळ :** स. १० ते रात्री ८.३०.
- **पुणे विद्यार्थी गृह :** इलेक्ट्रिक व्हेईकल टेस्टिंग आणि रोबोटिक्स अँड ऑटोमेशन लॅबोरेटरीचे उद्घाटन : **हस्ते :** डॉ. रघुनाथ माशेलकर. स्थळ : अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पर्वती. **वेळ :** स. १०.३०.
- **श्री तुळशीबाग सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ :** अग्निशमन दल अधिकारी व जीवरक्षकांचा कृतज्ञता गौरव कार्यक्रम : हस्ते : पालकमंत्री चंद्रकांत पाटील. उपस्थिती : माणिक चव्हाण, पोलिस सहआयुक्त संदीप कर्णिक. **स्थळ :** नू. म. वि. प्रशाला, बाजीराव रस्ता. **वेळ :** स. ११.३०.
- **पुणे इंटरनॅशनल सेंटर :** व्याख्यान - 'हाऊ टेक्नॉलॉजी गायडेड बाय स्पिरिच्युॲलिटी मे लीड टू हॅपिनेस' : **वक्ते :** डॉ. अनिल राजवंशी. **स्थळ :** नवलमल फिरोदिया सेमिनार हॉल, सेनापती बापट रस्ता. **वेळ :** दु. १२ ते १.
- **पीएमपीएमएल सेवानिवृत्त कर्मचारी संघ :** सेवानिवृत्त कर्मचारी ज्येष्ठ नागरिक मेळावा. **स्थळ :** पी. एम. टी. कामगार संघ (इंटक) ऑफिस, स्वारगेट : **वेळ :** दु. १२ ते २.
- **मधुनंदा-आनंदाश्रम :** व्याख्यान - ज्येष्ठनागरिक-आनंदमय जीवन : **स्थळ :** मधुनंदा, शिवा पॅलेस, वाघोली. **वेळ :** सायं. ४.३०.
- **श्री महालक्ष्मी मंदिर :** नवरात्र महोत्सवानिमित्त देवदासींच्या मुलींचे कन्यापूजन : **स्थळ :** श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग. **वेळ :** सायं. ५.
- **नृत्य भारती संस्था :** 'बिंदा कहे' पुस्तक प्रकाशन : हस्ते : अच्युत गोडबोले. **स्थळ :** न्यू इंग्लिश स्कूल. **वेळ :** सायं. ५.३०.
- **एस. एस. असोसिएशन :** 'मानिनी' पुरस्कार वितरण. उपस्थिती : ज्येष्ठ कर्करोगतज्ज्ञ डॉ. शेखर कुलकर्णी. **स्थळ :** सिध्दार्थ हॉल, माणिकबाग. **वेळ :** सायं. ५.३०.
- **स्नेहांजली प्रकाशन :** स्नेहांजली पुरस्कार वितरण : पुरस्कारार्थी : लेखक संभाजी भोसले. हस्ते : माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू. **स्थळ :** एस. एम. जोशी सभागृह. **वेळ :** सायं. ६.
- **राष्ट्रीय स्वयंसेवक संघ :** विजयादशमी शस्त्रपूजन उत्सव : वक्ते : सुनील मेहता. **स्थळ :** रमणबाग प्रशाला. **वेळ :** सायं. ६.१५.

केसरी

पुणे, १ ऑक्टोबर २०२२

## कोठे काय?

### सकाळी

६.०० : हृदय दिनानिमित्त आरोग्यविषय जनजागृती रॅली, प्रमुख : डॉ. ऋतूपर्ण शिंदे, स्थळ : महालक्ष्मी सभागृह, मित्रमंडळ चौक, पर्वती.

१०.०० : शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम, प्रमुख : प्रा. डॉ. राम ताकवले, स्थळ : जिजामाता सभागृह, शुक्रवार पेठ.

१०.३० : इलेक्ट्रीकल व्हेईकल टेस्टिंग आणि रोबोटिक्स अँड ऑटोमेशन प्रयोगशाळेचे उद्घाटन, हस्ते : डॉ. रघुनाथ माशेलकर, स्थळ : दादासाहेब केतकर सभागृह, पर्वती.

११.३० : अग्निशमन दल अधिकारी व जीवरक्षकांचा कृतज्ञता गौरव कार्यक्रम, हस्ते : चंद्रकांत पाटील, प्रमुख : माणिक चव्हाण, स्थळ : नू.म.वि. प्रशाला, बाजीराव रस्ता.

### दुपारी

१२.०० : लावणी महोत्सव, प्रमुख : वर्षा पवार, शिवानी कोरे, स्थळ : गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट

१२.०० : सेवोनिवृत्त कर्मचारी ज्येष्ठ नागरिक मेळावा, प्रमुख : गिरीश बापट, स्थळ : पी.एम.टी कामगार संघ कार्यालय, स्वारगेट

१२.०० : पुणे इंटरनॅशनल सेंटरतर्फे व्याख्यान, विषय : तंत्रज्ञान युगात आनंदी होण्याचे अध्यात्म , वक्ते : डॉ. अनिल राजवंशी, स्थळ : नवलमल फिरोदिया सेमिनार हॉल, एमसीसीआयए, सेनापती बापट रस्ता.

४.३० : ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त व्याख्यान, विषय : आनंदमय जीवन, वक्ते : बापुसाहेब साळुंखे, स्थळ : मधुनंदा शिवा पॅलेस, वाघोली.

### सायंकाळी

५.०० : नवरात्रौत्सवानिमित्त देवदासींच्या मुलींचा कन्यापूजन सोहळा, स्थळ : महालक्ष्मी मंदिर, सारसबाग.

५.३० : 'बिंदा कहे' पुस्तक प्रकाशन सोहळा, हस्ते : अच्युत गोडबोले, स्थळ : न्यु इंग्लिश स्कुल, टिळक रस्ता.

५.३० : मानिनी पुरस्कार वितरण सोहळा, हस्ते : डॉ. शेखर कुलकर्णी, स्थळ : सिद्धार्थ हॉल, माणिकबाग, सिंहगड रस्ता.

६.०० : स्नेहांजली पुरस्कार वितरण सोहळा, हस्ते : माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, पुरस्कर्ते : संभाजी भोसले, स्थळ : एस.एम.जोशी सभागृह, गांजवे चौक.

६.३० : विजयादशमी शस्त्रपुजन सोहळा, प्रमुख : सुनील मेहता, राहुलकुमार दर्डा, स्थळ : रमणबाग प्रशाला मैदान, शनिवार पेठ.

सकाळ » TODAY
पुणे, सोमवार, ३ ऑक्टोबर २०२२

# विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव द्यावा : डॉ. ताकवले

**पुणे, ता. २ :** शिकवणे म्हणजे केवळ माहिती द्यायची नाही तर सामाजिकता जोपासत कला, विज्ञान, तंत्रज्ञान या दृष्टीने शिक्षकांनी शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण शैक्षणिक संस्थांनी द्यायला पाहिजे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. राम ताकवले यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी मराठा सोसायटीतर्फे संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बाबूराव जगताप यांच्या पुण्यतिथी समारंभानिमित्त गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार पेठेतील संस्थेच्या जिजामाता सभागृहात कार्यक्रम झाला.

लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM
शुक्रवार, ७ ऑक्टोबर २०२२

# गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

श्री शिवाजी मराठा सोसायटीतर्फे संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बाबुराव जगताप यांच्या स्मृतिदिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, आप्पासाहेब तावरे, राजेंद्र ढेरे, बाळासाहेब गांजवे, नंदकुमार गोराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता बारणे-यादव, संस्थेचे मानद सचिव अण्णा थोरात, राजेंद्र जगताप, विकास गोगावले, सत्येंद्र कांचन, जगदीश जेधे, पद्माकर पवार, ॲड. एन. डी. पाटील या वेळी उपस्थित होते.

# 'क्षमतेला वाव देणारे शिक्षण द्यायला हवे'

पुणे : पुढारी वृत्तसेवा

'विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण शैक्षणिक संस्थांनी द्यायला पाहिजे,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. राम ताकवले यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी मराठा सोसायटी तर्फे संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बाबूराव जगताप यांच्या पुण्यतिथी समारंभानिमित्त गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

शुक्रवार पेठेतील संस्थेच्या जिजामाता सभागृहात कार्यक्रम झाला. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, अप्पासाहेब तावरे, राजेंद्र ढेरे, बाळासाहेब गांजवे, नंदकुमार गोराडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संगीता बारणे-यादव, सोसायटीचे मानद सचिव अण्णा थोरात, राजेंद्र जगताप, विकास गोगावले, सत्येंद्र कांचन, जगदीश जेधे, पद्माकर पवार, ॲड. एन. डी. पाटील उपस्थित होते.

आढाव म्हणाले, 'शिक्षण संस्थांनी तंत्रज्ञानाप्रमाणे आता बदलायला पाहिजे. काळाची पावले वेगाने पुढे जात आहेत. नवा देश घडवायचा असेल, तर आपल्यात बदल घडवायला पाहिजे. वेळेची किंमत समजून घ्या.'

अण्णा थोरात यांनी प्रास्ताविक केले. अमित गोगावले यांनी सूत्रसंचालन केले. बी. एम. गायकवाड यांनी आभार मानले.

प्रभात पुणे, सोमवार, दि. ३ ऑक्टोबर २०२२

# विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण असावे : प्रा. ताकवले

**पुणे, दि. २ -** शिक्षणात ज्यावेळी नवीन तंत्रज्ञान येते त्यावेळी क्रांती होते. शिकवणे म्हणजे केवळ माहिती द्यायची नाही तर सामाजिकता जोपासत कला, विज्ञान, तंत्रज्ञान या दृष्टीने शिक्षकांनी शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण द्यायला पाहिजे, असे मत माजी कुलगुरू प्रा. राम ताकवले यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी मराठा सोसायटी तर्फे संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बाबुराव जगताप यांच्या पुण्यतिथी समारंभानिमित्त शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, आप्पासाहेब तावरे, राजेंद्र ढेरे, बाळासाहेब गांजवे, नंदकुमार गोराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता बारणे - यादव, अण्णा थोरात, राजेंद्र जगताप, विकास गोगावले, सत्येंद्र कांचन, जगदीश जेधे, पद्माकर पवार, ॲड. एन.डी.पाटील उपस्थित होते. बाबा आढाव म्हणाले, शिक्षण संस्थांनी तंत्रज्ञानाप्रमाणे आता बदलायला पाहिजे.

केसरी

पुणे, ३ ऑक्टोबर २०२२

# 'विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण द्यायला हवे'

**पुणे :** शिक्षणात ज्यावेळी नवीन तंत्रज्ञान येते त्यावेळी क्रांती होते. शिकवणे म्हणजे केवळ माहिती द्यायची नाही, तर सामाजिकता जोपासत कला, विज्ञान, तंत्रज्ञान या दृष्टीने शिक्षकांनी शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण शैक्षणिक संस्थांनी द्यायला पाहिजे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. राम ताकवले यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी मराठा सोसायटी तर्फे संस्थेचे संस्थापक बाबूराव जगताप यांच्या पुण्यतिथी समारंभानिमित्त गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, आप्पासाहेब तावरे, राजेंद्र ढेरे, बाळासाहेब गांजवे, नंदकुमार गोराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता बारणे-यादव, सोसायटीचे मानद सचिव अण्णा थोरात, राजेंद्र जगताप, विकास गोगावले, सत्येंद्र कांचन, जगदीश जेधे, पद्माकर पवार, ॲड. एन.डी.पाटील उपस्थित होते.

प्रा. डॉ. ताकवले म्हणाले, नैतिकतेमुळेच माणूस मोठा होतो आणि जगप्रसिद्ध होतो. परंतु नैतिकता शिकवता येत नाही, तर ती कृतीतून दाखवावी लागते. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या कृतीतून ती विद्यार्थ्यांना शिकविली पाहिजे. कारण तुम्ही काय शिकवतात याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष नसते, तर कसे वागता याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष असते.

डॉ. बाबा आढाव म्हणाले, शिक्षण संस्थांनी तंत्रज्ञानाप्रमाणे आता बदलायला पाहिजे. काळाची पाऊले वेगाने पुढे जात आहेत. नवा देश घडवायचा असेल, तर आपल्यात बदल घडवायला पाहिजे. वेळेची किंमत समजून घ्या, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले. अण्णा थोरात यांनी प्रास्ताविक केले. अमित गोगावले यांनी सूत्रसंचालन केले. बी. एम. गायकवाड यांनी आभार मानले.

नवराष्ट्र | पुणे, ३ ऑक्टोबर २०२२

# विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण द्यायला हवे

## गुरुवर्य बाबुराव जगताप यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिष्यवृत्ती वाटप

## डॉ. राम ताकवले यांचे प्रतिपादन

पुणे, नवराष्ट्रन्यूज नेटवर्क. मागील ७५ वर्षात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. परंतु केवळ शिक्षण घेऊन उपयोग नाही तर त्यामध्ये उत्कृष्टता आली पाहिजे. शाळेतच नव्हे तर जगात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व्हायला पाहिजे. शिक्षणात ज्यावेळी नवीन तंत्रज्ञान येते त्यावेळी क्रांती होते. शिकवणे म्हणजे केवळ माहिती द्यायची नाही तर सामाजिकता जोपासत कला, विज्ञान, तंत्रज्ञान या दृष्टीने शिक्षकांनी शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेला वाव देणारे शिक्षण शैक्षणिक संस्थांनी द्यायला पाहिजे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. राम ताकवले यांनी व्यक्त केले.



श्री शिवाजी मराठा सोसायटी तर्फे संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बाबुराव जगताप यांच्या पुण्यतिथी समारंभानिमित्त गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार पेठेतील संस्थेच्या जिजामाता सभागृहात कार्यक्रम झाला.

यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.बाबा आढाव, आप्पासाहेब तावरे, राजेंद्र ढेरे, बाळासाहेब गांजवे, नंदकुमार गोराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता बारणे-यादव, अण्णा थोरात, राजेंद्र जगताप, विकास गोगावले, पद्माकर पवार, ॲड. एन.डी.पाटील उपस्थित होते.

प्रा. डॉ. राम ताकवले म्हणाले, शाळेतला शिक्षक आणि संस्थापक कसा असावा हे गुरुवर्य बाबुराव जगताप यांच्याकडे पाहिल्यावर लक्षात येते. ते नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ होते. नैतिकतेची शिक्षणात गरज आहे. नैतिकतेमुळेच माणूस मोठा होतो आणि जगप्रसिद्ध होतो. परंतु नैतिकता शिकवता येत नाही तर ती कृतीतून दाखवावी लागते. त्यामुळे शिक्षकांनी आपल्या कृतीतून ती विद्यार्थ्यांना शिकविली पाहिजे.विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. जेणे करुन विद्यार्थी आपल्या पायावर उभा राहु शकतो. कारण तुम्ही काय शिकवतात याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष नसते तर कसे वागता याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष असते. बाबा आढाव म्हणाले, शिक्षण संस्थांनी तंत्रज्ञानाप्रमाणे आता बदलायला पाहिजे. काळाची पाऊले वेगाने पुढे जात आहेत. नवा देश घडवायचा असेल तर आपल्यात बदल घडवायला पाहिजे. वेळेची किंमत समजून घ्या, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले.